**प्रेसनोट** दि. 31/01/2026

**अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणेकडून वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशनच्या पोलीस हवालदार यांचेवर लाच मागणी प्रकरणी कारवाई केलेबाबत.**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | **पुणे** |
| **पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक** | वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन 1988 चे कलम 7, 7 अ |
| **तक्रारदार** | महिला, वय 46 वर्ष |
| **आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय** | श्री रमेश लक्ष्मण नागटिळक वय 42 वर्षे पद पोलीस हवालदार ब.नं. 1452 रा.ठी.शारदानगर, माळेगाव तालुका बारामती जिल्हा. पुणे **(वर्ग - 3)** |
| **सुरवातीस मागणी केलेली लाचेची रक्कम** | **रू. 30,000/- (तीस हजार रूपये)** |
| **पडताळणी दरम्यान लाच मागणी** | **रू. 25,000/- (पंचवीस हजार रूपये)** |
| **पडताळणी दिनांक** | दि. 18/01/2026 |
| **ठिकाण** | वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशन येथे |
| **सापळा अधिकारी यांचे नाव व पद** | श्रीमती आसावरी शेडगे,पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि, पुणे (मो.क्र. 8425808058) |
| **तपास अधिकारी यांचे नाव व पद** | श्री. अविनाश घरबुडे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि, पुणे (मो.क्र. 9860667770) |

**थोडक्यात माहिती :-** यातील तक्रारदार याच्या मुलाविरूद्ध वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्याचा तपास वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशनच्या अंतर्गत येणा-या करंजेपूल आऊट पोस्टचे पोलीस उपनिरीक्षक राहुल साबळे हे करीत आहेत. यातील आरोपी लोकसेवक हे करंजेपूल आऊट पोस्ट या ठिकाणी पोलीस हवालदार म्हणून कर्तव्यावर असून वर नमूद गुन्हयामध्ये तपास अधिकारी पी.एस.आय.श्री. साबळे यांना मदतनीस म्हणून काम करीत आहेत. नमूद गुन्ह्यात तक्रारदार यांच्या मुलास जामीन मिळण्यास मदत करण्यासाठी व गुन्ह्याचे चार्जशीट लवकरात लवकर कोर्टात दाखल करण्याकरीता यातील आरोपी लोकसेवक पोलीस हवालदार रमेश नागटिळक व पोलीस उपनिरीक्षक राहुल साबळे हे तक्रारदाराकडे 30,000/- रूपये लाचेची मागणी करत असल्याची तक्रार तक्रारदाराने दि. 18/1/2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे दिली होती.

यातील तक्रारदार यांच्या प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दि. 18/01/2026 रोजी लाच मागणी पडताळणी कारवाई केली असता त्यादरम्यान लोकसेवक पोलीस हवालदार रमेश नागटिळक यांनी तक्रारदार यांच्या मुलाविरूद्ध दाखल असलेल्या गुन्ह्यात मुलाला जामीन होण्यास मदत करण्यासाठी व गुन्ह्याचे चार्जशीट लवकरात लवकर कोर्टात दाखल करण्यासाठी स्वतः करीता व पोलीस उपनिरीक्षक राहुल साबळे यांच्याकरीता तडजोडीअंती 25,000/- रूपयाची लाच मागितल्याचे निष्पन्न झाले.

वरील आरोपी लोकसेवक यांना ताब्यात घेऊन त्यांच्याविरूद्ध वडगाव निंबाळकर पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण येथे गु.र.क्र 20/2026 भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7, 7अ नुसार दि. 31/01/2026 रोजी वेळ 14:33 वा.गुन्हा दाखल केला आहे.

**सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि. पुणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, ला.प्र.वि. पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली. लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. 9823167154) तसेच अपर पोलीस अधीक्षक-1 श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि.,पुणे (मो.क्र. 9029030530) यांनी केले आहे.**

1) **अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे- दुरध्वनी क्रमांक** -020-26122134, 26132802, 26050423, 9403781064
2) **व्हॉट्स-अ‍ॅप क्रमांक - 9403781064 (पुणे)**, 9930997700 **(मुंबई)**
3) **ई-मेलआयडी - पुणे** dyspacbpune@mahapolice.gov.in
4) **वेबसाईट** - www.acbmaharashtra.gov.in
5) **ऑनलाईन ॲप तक्रार** - www.acbmaharashtra.net.in

**दयानंद गावडे**
सहा.पोलीस आयुक्त / पो. उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.